निवडक ओव्या

भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

भावार्थ ज्ञानेश्वरी

निवडक ओव्या

मूळ रचना : संत श्री ज्ञानेश्वर महाराज

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर

श्री. विजय बळवंत पांढरे

माजी चिफ़ इंजिनियर, महाराष्ट्र राज्य

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

श्री विजय पांढरे
मु. पो. लाखनवाडा
ता. खामगांव
जि. बुलढाणा, महाराष्ट्र
फोन: ९८२२९९२५७८
vbpandhare@gmail.com

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
प्रकाशन : ५ जुलै २०२० (गुरूपौर्णिमा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

अध्याय पहिला

संपता भ्रम अज्ञान । होतसे बोधाचे प्रकटन । संपतसे जे जन्ममरण । ज्ञान होता ।।३५।।
घडता ती संतसंगती । येते बा ती विरक्ती । प्रकटते मग ती मुक्ती । बोध होता ।।५३।।
शब्दांच्या पलीकडे जाता । मनइंद्रियासी तादात्म्य तुटता । प्रकटते ती आत्मसत्ता । आपोआप ।।५८।।

अध्याय दुसरा

जे विवेकवान असती । ते सुखदुःख सम मानती । जन्ममरण दोन्ही भ्रांती । जाण अर्जुना ।।१०२।।
अनित्यता संस्काराची जाणून । तयाशी तादात्म्य तोडून । तू हो आत्मवान । अर्जुना माझ्या ।।१२२।।
जयाचे संस्कारांशी तादात्म्य तुटते । तयाचे सुखदुःख संपले। मग भवचक्र भंगले। तयांचे अर्जुना ।।१२३।।
एकत्रित असता धान्य भूस । जर ते पाखडल्यास । शिल्लक रहाते धान्य रास । जैसी अर्जुना ।।१३०।।
संतसंग तो घडता । मनइंद्रियासी तादात्म्य तुटता । स्वप्न सुषुप्तीत जागता । आत्मज्ञान ।।१७१।।
होता अंतरी निश्चल । जे प्राप्त न्याहाळता केवल । चैतन्यच मग विश्व सकल । तयासाठी ।।१७२।।
मोहासी त्या त्यागावे । जशास तसे व्हावे । रणी ते झुंजावे । निष्कामपणे ।।१९०।।
चूक ते कामनेत अडकणे । आणि स्वर्गसुख इच्छिणे । मग आत्मतत्वास मुकणे । आपोआप ।।२५०।।
अर्जुना समत्व चिताचे । तेच सार जाण योगाचे । विसर्जन होता मनविचारांचे । योग घडे ।।२७३।।
या रहस्यास जर जाणशील । मोहास या जर सांडशील । मग योगयुक्त होशील । समत्व साधता।।२८०।।
मन इंद्रियांच्या संगती । भ्रष्ट होती जी मती । स्थिर होईल आता ती । योग घडता ।।२८३।।
ऐसे शरीर मनाशी तादात्म्य तुटणे। मी माझेपण संपणे। अहं ब्रम्हास्मि अनुभवा येणे। ज्ञान अर्जुना ।।३०९।।
शरीराने विषय त्यागणे । परि मनी विषयांचे चिंतणे । मग भवचक्राचे चालणे । अव्याहत ।।३१८।।

Scanned with CamScanner

अध्याय तिसरा

प्राप्त कर्म न करणे । तरी नैष्कर्म्य होणे । वायाचि ते बोलणे । वायफळ ।।४६।।

तुम्ही व्रत नियम न करावे । शरीराते न पीडावे । दूर कोठे न जावे । तीर्थासी गा ।।८९।।

योगादिक साधने । सकाम आराधने । मंत्रतंत्र विधाने । करू नका ।।९०।।

देवतांतरा न भजावे । हे सर्वथा काही न करावे । स्वधर्मानुधारे वर्तावे । सर्वकाळ ।।९१।।

सर्व हेतू सांडून । करा निष्काम आचरण । जसे पतिव्रतेचे मन । एकनिष्ठ ।।९२।।

तैसे हे स्वधर्म आचरण । मन निष्काम करून । जगणे आपले जीवन । साधना अर्जुना ।।९३।।

स्वधर्म तो भजता ।कामधेनुच येते हाता । मन निष्काम होता । कामनापूर्ती ।।९४।।

म्हणून स्वधर्म जो सांडील । तया काळ दंडील । चोर ते लुटतील । सर्वस्व त्याचे ।।११२।।

आपल्या मनास पहावे । सदैव निर्विकल्प रहावे । निष्काम कर्म करावे । सदोदित ।।११९।।

आपले दुर्गुण पहावे । गुण ते वाढवावे । दोष ते त्यागावे । क्षणोक्षणी ।।१२०।।

म्हणून स्वधर्म आचरता । मनी निष्काम होता । मग संस्कार ते संपता । घडे मोक्ष ।।१२५।।

देह इंद्रिय आणि मन । जे मुक्तीचेच साधन । निष्कामता आचरून । मुक्त व्हावे ।।१२८।।

आधी कामक्रोधा जाळावे । मग ज्ञानास पावावे । तववरी न संभवे । ज्ञान अर्जुना ।।२६३।।

मनइंद्रियास जाणता । कर्ममायेस ओळखता । सर्व संस्कार संपता । ज्ञान होते ।।२६७।।

Scanned with CamScanner

अध्याय चवथा

जे मी-तूपणा सोडती । कामनाशून्य होती । इच्छांची संपता गती । ज्ञान होते ।।६०।।
जगी भक्तीचा आभास । परि ते अज्ञान खास । मनी असता ती आस । भक्ती कैची ।।६७।।
मनी जे जे असणे । मग तैसेच ते भासणे । ते मनो संमोहनाकारणे । जाण अर्जुना ।।७२।।
जैसे जे बीज पेरावे । फल तसेच मग पावावे । हे कार्यकारण आघवे । जाण अंतरी ।।७४।।
या अज्ञानी लोकांच्या भजना । मी साक्षीभूत अर्जुना । ही जी अनुभवाची भावना। ती व्दैतबुध्दी ।।७६।।
सांडोनिया इंद्रिय मन । संपले जयाचे अहंपण । आत्मतत्वा अनुभवून । तृप्त तृप्त ।।१०८।।
ऐसे बघ अर्जुना । जाळून सर्व दोषांना । प्राप्त होऊन आत्मज्ञाना । मुक्त तो ।।१३१।।
मन इंद्रियासी सम राहून । विवेकाचे मंथन करून । अंतरी गुरूवाक्य अनुभवून । सुटतो तो ।।१३२।।
मनाचे जे मनपण । तेच गेले विरून । सुटणे त्या मनइच्छेतून । सूत्र अर्जुना ।।१३५।
श्वासोच्छ्वासाचे अवधान ठेवून । मनोविकारांस जाळून । शुध्द होऊ देणे मन । सूत्र अर्जुना ।।१४५।
सकल कामना आणि मन । अवधान यज्ञी करता हवन । मग प्राप्त होते आत्मज्ञान । आपोआप ।।१४८।
स्थूल साधनी अडकता । बहिर्मुख ते वर्तता । आत्मतत्वाची वार्ता । मग प्रगटेच ना ।।१५८।
कर्मप्रवृत्ती निरसता । तर्काची संपते सत्ता । मनइंद्रियाशी तादात्म्य तुटता । योग घडे ।।१६२।
पावण्या हे ज्ञान । जा तू ज्ञान्यासी शरण । विचारून ते प्रश्न । व्हावे ज्ञानी ।।१६५।
ज्ञानी ज्ञानाचे भांडार । उपदेशतसे ते सार । सोडून सर्व असार । ज्ञानी व्हावे ।।१६६।
सत्संगी ते रमणे । मनइंद्रियासी तादात्म्य तुटणे । अहंभाव तो निरसणे । सूत्र अर्जुना ।।१६७।
सार ते ऐकणे । आंतरमनी सार अनुभवणे । घडे निष्काम मग होणे । अनुभवता सार ।।१६८।
ज्या जिवाच्या ठायी । आत्माज्ञानाची आवड नाही । तयाचे जगणे तेही । व्यर्थ अर्जुना ।।१९३।
जर मंत्राने वैरी मरे । मग वायाची बाळगणे हत्यारे । रोग जर जाये साखरे। मग निंब का प्यावा ।।२२३।

Scanned with CamScanner

अध्याय पाचवा

निष्काम होता मी । सर्व इच्छाच संपून जाती । तीच आत्मतृप्तीची स्थिती । जाण अर्जुना ।।२१।।
कर्मसिध्दांत न जाणता । केवळ संन्यास तो घेता । ऐसी कर्म पलायनता । दुःखदायी ।।३३।।
जयांनी मनोभ्रमास जाणले । गुरूवाक्ये मन धुतले । मग ते आत्मस्वरूपी पावले। आपोआप ।।३४।।
जो मनी निष्काम जाहला । मनोभ्रांतीतून सुटला । तो आत्मतत्वी पावला । ज्ञान होता ।।४७।।
जयांचा अहंम्भाव खुंटला । जो मनइंद्रियातून सुटला । तयासीच समजला । बोल माझा ।।६५।।
कामना मनी असता । कैची ती शांतता । कामनी त्या अडकला । अतिदुःख अर्जुना ।।७२।।
तो सृजी पाळी संहारी । ऐसे बोलती जे चराचरी । ते अज्ञान गा अवधारी । पंडुकुमारा ।।८२।।
ऐसे व्यापक ज्ञान भले । जयांच्या अंतरी प्रकटले । मग आपोआप समत्व पावले । मन तयाचे ।।८८।।
अहंभाव असता अंतरी । भेद दिसतो बाहेरी । संपता अहंभावाची शिदोरी । भेद नाही ।।९५।।
ऐसी समत्व दृष्टी प्रकटता । जो स्वयेचि ब्रम्ह सर्वथा । मुक्तीची ती संपूर्णता । तेथे अर्जुना ।।१०४।।
जे इंद्रियभोगातून सुटले । नि मन इच्छेतून तुटले । तयांचे संदेश सर्व फिटले । होता आत्मज्ञान ।।१४७।।

Scanned with CamScanner

अध्याय सहावा

श्रवणाचे करून निमित्त । होऊ द्यावा मनाचा अंत । मग ज्ञान ते प्रकटतं। अंतरंगी ।।२४।।

मनाची ती निष्कामता । तीच ज्ञानाची रहस्यता । प्रकटते ती आत्मसत्ता । निष्काम मनी ।।२७।।

जयांची नाही निष्काम मती।ते या ग्रंथा समजू न शकती।तसे कावळे न ओळखती।चंद्रासी अर्जुना ।।२९।।

येथे निष्काम ते पात्र । आणि सकाम ते अपात्र । अनुभवती आत्मतत्व सर्वत्र । निष्काम मती ।।३०।।

तो राहो गृहस्थाश्रमात । वा त्या संन्यासाश्रमात । कामनांपासून जो अलिप्त । तो योगी अर्जुना ।।५०।।

ऐसे अभ्यासाचे बळे। मन इच्छापासून होता निराळे । मग वैराग्य ते उजळे। जीवनी अर्जुना ।।५७।।

जयांचे त्या मनी । नाही इंद्रिय-विषयांची धुनी। जाण तो आत्मज्ञानी । अर्जुना तू ।।६२।।

मग तिर्थ असे तेथेचि । वाट दाखवी जो मुक्तीची । अनुभूती ती ब्रम्हमयतेची। त्याच्यासंगे ।।१०२।।

मन इंद्रियासी निष्काम होणे। मनी अवधान ठेवणे। मन इच्छा सोडणे। ते सूत्र अर्जुना ।।१५५।।

ऐसे अनुभवांच्या प्रति । जे निर्विकल्प रहाती । तया होते ती प्राप्ती । आत्मज्ञानाची ।।१५९।।

त्या ज्ञान तळमळी कारणे । एकांती जाऊनी बैसणे । मनइंद्रियांसी विरक्त होणे । पात्रता अर्जुना ।।१६४।।

संतानी जो मार्ग चोखाळला। त्यासीच म्हणावे बा आपुला। मन-इच्छांच्या त्या भरीला । पडू नये ।।१६५।।

आपला आपण अभ्यास करी।अवधान ठेवूनी आंत बाहेरी। निष्काम होणे अंतरी। साधना अर्जुना ।।१६६।।

विषयांचा विसर पडणे। इंद्रियांच्या सवयी सुटणे। मनाचे मनपण विरणे। ते ध्यान अर्जुना ।।१८८।।

ऐसी समज असता। साधते ती ध्यानावस्था। शरीर मनाची स्थिरता। ते सूत्र अर्जुना ।।१८९।।

स्थिर होता ते मन । संपे मनाचे वढाळपण । चिंता इच्छांचं असणं। संपूर्ण जाई ।।२०६।।

मन अंतर्मुख होता। मनी शांतता प्रकटता। मनाचे मनपण विरता । ज्ञान होते ।।३६७।।

भुतांचे जे भासे भिन्नपण। ते भ्रमाच्याच कारण । संपता मनाचे भ्रमपण । ज्ञान अर्जुना ।।३९४।।

Scanned with CamScanner

अध्याय सातवा

बुध्दि ती संपता । नि विचार ते विरता । तर्काची होता सांगता । प्रकटे ज्ञान ।।५।।
अर्जुना ती जाणीव ते ज्ञान।जे जाणले जाते ते विज्ञान। तर्कबुध्दि विचार हे अज्ञान। समजो तुला ।।६।।
येथे एक नवल होय । जो जो करणे उपाय । तो करीतसे अपाय । जीवभावा ।।८२।।
वैराग्य न प्राप्त होता । विवेक तो न प्रकटता । काहीही ते करता । अपायचि घडे ।।९१।।
येथे एकचि तरला । जो मन इच्छांसी तुटला । तोच बा मग गेला । पैलतीरी ।।९७।।
जया सद्गुरू भेटले । जयाच्या मनाचे मनपण विरले । तयानेच अंतरंगी जाणले । ते आत्मतत्व ।।९८।।
संकल्पांचे ओझे सांडणे । विकल्पांच्या झुळका चुकवणे । अनासक्त ते होणे । रहस्य अर्जुना ।।९९।।
ऐसे जयांनी इच्छेस सांडले। मनाचे मनपण विरले। अवधानी तयांनीच बा जाणले। ते आत्मतत्व ।।१०२।।
जयांच्या त्या अंतरी ती । विश्व एकात्मतेची अनुभूती । तो दुर्लभ या जगती । जाण अर्जुना ।।१३७।।

अध्याय आठवा

ऐसे जे साक्षीपण । जे शून्य नव्हे स्वभावानं । परी ते गगनाहून । सूक्ष्म असे ।।१६।।
घडता अहंभावाचे समर्पण। प्रकटते ते ज्ञान । मग ज्ञेय आणि ज्ञान । भिन्न नाही ।।५२।।
बहिर्मुखतेची सवय सोडून । मन अंतर्मुख करून । जावे अंतरंगी विरून । अर्जुना आता ।।१११।।

Scanned with CamScanner

अध्याय नववा

अवधान एकवेळ दीजे । मग सर्व सुखासी प्राप्त होईजे। हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड ऐका ।।१।।
तैसे प्रथम कामना त्यागणे । नि मग ज्ञानाची भेट घेणे । ऐसे ज्ञानाचे अनुभवणे । घडे अर्जुना ।।५०।।
मीपणाची झोप मोडो। स्वरूप बोधाचे कवाड उघडो। गाठ ती तुझी पडो। तुझी तुझ्याशीच ।।९६।।
मन बुध्दी शब्दा कारणे। ज्ञान कळले ऐसे वाटणे। परि मृगजळाच्या त्या ओलाव्याने। अंकुर नाही।।१३७।।
जे स्थूल दृष्टीने देखती । ते मज प्रतितीस चुकती । स्वप्नी जे अमृत पिती । ते भ्रमित अर्जुना ।।१४४।।
जे मज नामरूपी मानती । ते मज प्रतितीस चुकती । ते चंद्रबिंब धरिती । जळी जेवी ।।१५०।।
रागद्वेषाच्या कारणे। तयांचे अज्ञानी रमणे । भ्रमासी सत्य मानणे। घडे तेथे ।।१८३।।
मन बुध्दिच्या कुंडात । ज्ञानाग्नी होऊ द्यावा प्रदीप्त । अवधानी समत्व धरत । ब्रम्ह व्हावे ।।२४१।।
मनी विवेक धरून । अंतरी अवधान साधून । ज्ञानास उपलब्ध होणं। यज्ञ अर्जुना ।।२४२।।
स्वतःच अमृत असून। आपले आपल्या विस्मरण। मग स्वतःसी मर्त्य मानणं। दुर्दैव ते ।।३०३।।
मनी इच्छा धरून। भजन पूजन होणं। ते पापच की करणं। पुण्य समजून ।।३१२।।
जाणून घे अर्जुना। या पापपुण्य व्दैत कल्पना । स्वर्ग आणि नरक दोहोंना । त्यागणे हिताचे ।।३१५।।
मातेच्या उदरात। नि विष्ठेच्या संगतीत। नऊ मास हाल भोगीत। अडकती भवचक्री ।।३३१।।
मी जाणले ऐसे म्हणतो। तो काहीच न जाणतो। जो मोठेपणा मिरवतो। तो काहीच नाही ।।३६८।।
विधि यज्ञ आणि दान । जप तपादि साधन । तया किंमत एका काडीहून । जास्त नाही ।।३६९।।
शरीरासी तादात्म्य तोडून । मन गुणातीत होऊन । जीवभाव संपणं। कल्याणदायी ।।३८१।।
मजसी एकत्व न जाणणे । मग वायाचि फुले आणि पाने । मजठायी एकरूप होणे।तीच भक्ती ।।३९६।।
निष्काम ते होता। घडे मजठायी एकरूपता। म्हणून सत्वर तू आता । निष्काम हो ।।३९७।।
कर्मसिध्दांत जाणणे। जन्ममरण टाळणे। मनी निष्काम होणे । सूत्र अर्जुना ।।४०५।।
देहासी तादात्म्य तोडता। सुखदुःखी सम राहता। स्वप्न सुषुप्ति ओलांडता । एकत्व मजसी ।।४०६।।
अंतरी आम्ही अभेद। केवळ नामरूपाचाच भेद । नामरूपास जाणे छेद। रहस्य अर्जुना ।।४११।।
पूर्वी वाईट त्यांचे आचरण। असेना का तो दुर्जन। तो मजसी एकत्व पावून। मुक्त होई ।।४१६।।
जे माझी भक्ती करती। अंती तया उत्तम गती। ते मजसीच पावती। आयुष्य सरता ।।४१७।।
आधी जरी वाईट वागला। पण नंतर जो सुधारला। तो महापुरातून वाचला। अर्जुना जसा ।।४१८।।

Scanned with CamScanner

तो दुराचारी जरी होता। पण मनी पश्चाताप प्रकटता। होई सर्व पापातून मुक्तता। त्यांची अर्जुना ।।४२०।।

ऐसा पश्चाताप होता। पापांचा ढीग संपता। तया अंतरी पवित्रता। प्रकटे अर्जुना ।।४२१।।

ऐसे मनबुध्दि सांडता। मनी निष्काम होता। मजसी एकत्व पावता। मुक्ती अर्जुना ।।४२४।।

वाया रूप तारुण्याची सुंदरता। नि जपतपाची वाच्यता। जोवरी नाही मजसी एकता। ते पाल्हाळ सारे ।।४३२।।

निंबासी निंबोळ्या आल्या। त्या कावळयांनीच खाल्या। तसा भक्तिहीन जातो वेढल्या । दोषांनींच।।४३८।।

माझ्यासी एकरूपता। तीच जीवनाची सफलता। इंद्रिय मनबुध्दि सरता। माझी गाठ ।।४५५।।

म्हणून कुळ जाती वर्ण। हे अवघेचि गा अकारण। मजसी एकरूप होणं। भक्ती आहे ।।४५६।।

वनात वणवा पेटला असता। का न करावा वाकडा रस्ता। आणि टाळण्या ही दुःखता। करावी भक्ती ।।४९२।।

जीवपण दुःखाचा डोंगर। तेथे मरणाचा वावर। टाळून हा दुःखाचा बाजार। मुक्त व्हावे ।।४९६।।

ऐशा मरणाच्या ठिकाणे। कैसे वा सुखी होणे। दुःखात सुख शोधणे। मूर्खपणा ।।४९७।।

ऐसी अनित्य जी स्थिती। तिजला मूर्ख सुख मानती। आणि अखंड जन्ममरण घेती। मृत्युलोकी ।।५०७।।

पावण्या मजसी एकता। कवडीचीही नाही आवश्यकता। परि ओतती संपत्ती सर्वथा। जेथे हानी ।।५०८।।

जो विषयात वा गुंतला। तया म्हणती सुखी झाला। जो इच्छांखाली मेला। म्हणती त्यास ज्ञानी ।।५०९।।

सर्पाने बेडूक अर्धा गिळला। तरी तो बेडून धरू पाहे माशीला। तैसे यांच्या लोभाला। अंत नाही ।।५१४।।

या मृत्युलोकाच्या ठिकाणी। सारी उरफाटीच कहाणी। अर्जुना येथे जन्मनी। फसलास तू ।।५१५।।

घडण्या मृत्युलोकाचा त्याग। तू भक्तीच्या वाटेस लाग। प्राप्त होता तो योग। मीच होशी ।।५१६।।

तू मन हे मीचि करी। माझिया भजनी प्रेम धरी। सर्वत्र मज नमस्कारी। एकतत्वा ।।५१७।।

मजठायी ठेवून अवधान। मनोसंकल्प जाऊ जे जळून। मजसी मग एकत्व पावून। मुक्त होशी ।।५१८।।

Scanned with CamScanner

अध्याय दहावा

करण्या तुझे प्रकटन। असमर्थ सारी साधनं। रहस्य हे जाणून। नमितो तुजला ।।१३।।
मन बुध्दिच्या कारणे। जर होईल तुझे प्रकटणे। ते तर भांग पिऊन बोलणे। जाणतो मी ।।१४।।
देहबुध्दि ती संपता। स्वप्नसुषुप्ती ओलांडता। मनी आकळली गीता। अंतरी माझ्या ।।२१।।
काय सांगू महत्व नवव्याचे। सार जे संपूर्ण गीतेचे। सत्य चिंतन निर्गुणाचे । प्रकटले येथे ।।३५।।
नवव्यात जे सांगितले। जे जयाने जाणितले। तयासीच बा उमजले। ते गीतातत्व ।।३९।।
तया सोडूनी जाई पाप। जैसे जळत्या चंदना सर्प। मनातील विरता संकल्प। भेट माझी ।।८०।।
ऐसे विश्वासी एकत्व पावून। जया अंतरी अभेदाची जाण। तयाचेच बा भजन। पूर्ण झाले ।।१०९।।
जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ।।११८।।
मग त्या बोधाचे कारणे। विश्वी निश्चिंत होऊन राहणे। आणि त्या बोधाचेच घेणे देणे। आवडे तया ।।१२०।।
व्दैत विरहित जे अव्दैत। अंतरी अनुभवती माझे भक्त। लपवून ठेवले ते अंतरात। भक्तांसाठी ।।१३९।।
ब्रम्हमयतेची ही बात। ती शब्दांत नाही येत। अनुभूती येता अंतरात । भेट माझी ।।१४०।।
त्या ज्ञानियासाठी। दिवसा मशाल घेऊन हाती। मीच दावे वाट ती। पुढती पुढती ।।१४२।।
नाम जप यज्ञ परम। तया न बाधू शके स्नानादि कर्म। नामे पावन धर्माधर्म। ते नाम मी ।।२३३।।
त्या मेधा क्षमा धृति। माझेच रूप बा असती। प्रकटून त्या या जगती। नांदती सदा ।।२७९।।
अगा ज्ञानियांच्या ठिकाणी । मीच राही ज्ञान बजूनी। मी आणि तो ज्ञानी। भिन्न नाही ।।२९९।।
जेथे जेथे शक्ती आणि दया। दोन्ही वस्तीस आली ठाया। ते ते जाण धनंजया। विभूति माझी ।।३०७।।
माझ्या एकाचि अंशाने। अवघे जग मी व्यापिले असणे। केवळ समत्व साक्षीने। ज्ञान माझे ।।३१७।।

Scanned with CamScanner

अध्याय अकरावा

घडता शुध्द ते श्रवण। होते ब्रम्हमयतेचे प्रकटन। ठेवणे अंतरंगी अवधान। साधता अर्जुना ।।८।।
या ग्रंथासी कोणीही वाचावे। अंतरी अवधान ठेवावे। आणि ब्रम्हमय होऊन जावे। आपोआप ।।१०।।
ऐसे ज्ञान मूर्तिमंत। जयाकारणे ब्रम्ह प्रकटतं। ते केवळ शुध्द श्रवणात । भेटेल तुम्हा ।।११।।
केवळ अर्जुनासाठी सांगितलं ज्ञान। चूक ते असं मानणं। हे गीतार्थाचं प्रयोजन। सर्वांसाठी ।।१४।।
जे मनइंद्रियातीत असते। केवळ ज्ञानदृष्टीस दिसते। माझ्या चर्मचक्षूस ते । दिसेस कैसे ।।१५९।।
मी निराळा विश्वाहून हे अंतरी जे होते व्दैतपण। ते गेले पहा आटून। अनुभूती येता ।।२४५।।
जीवभाव तो सोडून। सर्व कर्मे ती जाळून। पहा गेले निर्गुणात एकरूप होऊन। ते भक्त ज्ञानी ।।३२७।।
आणि जे गेले घाबरून। ते प्रार्थती दोन्ही हात जोडून। आणि व्दैतात त्या अडकून । करती व्दैत भक्ती ।।३२८।।
मज साक्षात्काराची गोडी। पण बोध लागला देशोधडी। गुरूशिष्य संबंधाची वाडी। उद्ध्वस्त झाली ।।३७०।।
विश्वरूपाने गिळले। सर्वांचे शरीर जरी संपले। तरी सूक्ष्म देह ते वाचले। जो जीवभाव ।।४१७।।
या शरीराच्या आत। आत्मतत्व जे असे जीवभावात। ते महाकाळाच्याही तॉडात। नष्ट नाही ।।४१८।।
अतिकठीण ती गोष्ट अनुभवणे। जी उपनिषदही न जाणे। ते आत्मतत्त्वाचे लेणे। दाविले मजसी ।।५८४।।
बुध्दिने आत्मतत्त्वा जाणणं। नच कधी ते होणं। बुध्दिपासून ते अंतःकरण । दूर आहे ।।५८७।।
तया कान न ऐकू शकती। आणि न डोळे पाहू शकती। आहे आत्मतत्त्वाची वस्ती। मनइंद्रियातीत ।।५८८।।
कैसा प्राप्त झालासी अज्ञानाला। काय म्हणू मी तुला। शरीर सोडून छायेला। आलिंगतोस तू ।।६२९।।
जे माझे मूळ रूप नसणे। तयासी तू इच्छिणे। बरे नाही तुझे वागणे। जाण अर्जुना ।।६३०।।
इच्छितोस चतुर्भुज दर्शन। टाकून दे ती इच्छा मनातून। त्यातच तुझे कल्याण। आहे अर्जुना ।।६३१।।
त्या चतुर्भुज दर्शनना । जास्त महत्व न द्यावे अर्जुना। जिवाच्या त्या कल्याणा। न ते कामाचे ।।६३६।।
होण्या जिवाचे कल्याण। न विसरावे विश्वरूप दर्शन। या विश्वरूपा ठायीच जाण। कल्याण तुझे।।६३७।
कधी नव्हतेच तू देखिले। म्हणून भव तुजठायी उपजले। टाकून दे भय मनातले। अर्जुना तू ।।६३८।
जैसे गुरूकृपा होता। ओसरते पंचभुतांची ती सत्ता। आणि आत्मतत्त्व तत्त्वतः। अनुभवा येते ।।६५६।
पहा तान माझी फिटली। अमृतसिंधूची भेट झाली। मरणाची भीती संपली। भगवंता आता ।।६७१।
विश्वरूप ध्यानी ठेवावे। नि मग मूर्तीसी पहावे। हे शास्त्र ते आघवे। विसरला अर्जुना तू ।।६७४
होण्या विश्वरूपाचे दर्शन। येथे नाही काहीच साधन। उपासना अन तपश्चर्येनं। न प्राप्ती माझी ।।६८३।
त्या दानात आणि यज्ञात। नाहीच बा प्राप्ती होणं। जसे तू अयाचित। अनुभवले मजसी ।।६८४
फक्त त्या तळमळीकारण। माझी बा प्राप्ती होणं। चित्ता वरता त्या भक्तीनं। अनुभूती माझी ।।६८५
मनइंद्रियांसी तादात्म्य तुटता। भावभावना विचार सरता। सर्व इच्छा वासना संपता। भेट माझी ।।६८८
जगी जे काही दिसणे। ते सर्व आपणचि होणे। ऐशी अनुभूती अंतरी येणे। भक्ती अर्जुना ।।६९१
जोवरी सूर्य न उगवला। तोवरी अंधाराचा घाला। एकदा का सूर्योदय झाला। मग प्रकाश चोहीकडे ।।६९३
ऐसे जगासी एकत्व जाणावे। मग जगचि होऊनी रहावे। ऐसे जाणणे मजसी स्वभावे। भक्ती अर्जुना ।।६९५

Scanned with CamScanner

अध्याय बारावा

सगुण कृष्णमूर्तीच्या ठिकाणी। माझी आवड ती पाहूनी। ते योग्य नाही असे भगवंतांनी। म्हटले होते ।।२२।।
तरी व्यक्त आणि अव्यक्त। तूचि असे एक निभ्रांत। भक्तिद्वारे भेटते ते व्यक्त। आणि योगे अव्यक्त ।।२३।।
दोन्हीही त्या वाटेने। घडे तुजसीच पावणे। व्यक्त अव्यक्ताच्या दोन्ही दाराने । भेट तुझी ।।२४।।
जे असतात बा ज्ञानी। ते रमती पहा निर्गुणी। ते चारी वाचा संपवूनी। पावती तुजला ।।३१।।
आणि जे असतात ज्ञानी। ते सोहम् साधना करूनी। स्वप्न सुषुप्तीसी ओलांडूनी। जाती ते ।।४०।।
तेथे मनाचे काही न चालते। तेथे बुध्दि कधी न पोहचते। तया इंद्रिये कधी ते । जाणतीच ना ।।४१।।
शरीर मनासी तादात्म्य तुटता। स्वप्न सुषुप्ति ओलांडता। अहंभाव तो विरता। प्रकटते ते ।।४२।।
जे सर्वत्र करीतसे वास। जयाकारणे विश्वाचा आभास। परि मनइंद्रिय विचारास। अप्राप्त ते ।।४३।।
तयासी शोधू जाता। ते सापडेच ना तत्त्वतः। कोणताही विधी अवलंबिता। न प्राप्ती त्याची ।।४४।।
जे चळे ना ढळे। कधीच सरे ना मळे। ते करूनी अहंभावाचे वाटोळे। जाणले त्यांनी ।।४५।।
वैराग्य अग्नी पेटवून। मनइंद्रियांसी तादात्म्य तोडून। सर्व कल्पना त्या सांडून। ते मुक्त होती ।।४६।।
मनी संयम धरणे। इंद्रियसुखांना लाथाडणे। मन निर्विकल्प करणे। सूत्र अर्जुना ।।४७।।
आशेचे पाश तोडून। संयमाचे बुरूज उभारून। अज्ञान निर्देस ओलांडून। मुक्त व्हावे ।।४९।।
सतत समबुध्दि होऊन। सोहं साधनेस ओलांडून। ते जातात ब्रम्हमय होऊन। अंतरंगी ।।५७।।
ऐसे कर्मासी जाणून। निष्काम कर्म करणं। तेच कर्मबंधाचं संपणं। आहे अर्जुना ।।७८।।
जेथवा मन बुध्दि संपते। तेथवा आत्मतत्त्व प्रकटते। हे ज्ञानाचे सूत्र ते । जाण अर्जुना ।।९९।।
सूर्य तो मावळता। संपते ती प्रकाशता। तैसे मनबुध्दि संपता। संपते व्दैत ।।१००।।
जेथवा जीव शरीर सोडतो। तो इंद्रियही सोबत नेतो। तैसे अहंकार संपतो। संपता मनबुध्दि। ।।१०१।।
ऐसे मन बुध्दि विरता। घडे आत्मतत्त्वी एकरूपता। मग तू आणि विश्वात्मकता। भिन्न नाही ।।१०२।।
माझ्या या वचना। अपवाद नाही अर्जुना। संपू दे त्या मना। होण्या ज्ञान ।।१०३।।
माझे नाम ते घेता। मनी प्रकटते ती शांतता। मग विषयामाजी अनासक्तता। वाढेल तुझी ।।१०६।।
इंद्रिया न कोंडी। भोगासी न सोडी। अभिमान न तोडी। स्वजातीचा ।।११५।।
चांगला का खडबडीत। रथ असे का कधी विचारीत। ऐसी समत्वाची रीत। साधना अर्जुना ।।१२१।।
सोडून प्रवृत्ति आणि निवृत्ती। सम ठेवून ती चित्तवृत्ती। अखंड सजगता ती। असावी बा मनी ।।१२२।।
जी जी घडेल कर्मठता। तिला चांगले वाईट न म्हणता। सर्व कर्म मजसी अर्पिता। मोक्ष घडे ।।१२३।।

Scanned with CamScanner

ऐशा या समत्वाने। होईल जयाचे जगणे मरणे। घडे तयाचे आपोआप येणे। मजठायी अर्जुना ।।१२४।।
जर न जमेल हे तुज। न देऊ शकशील कर्म मज। तरी गा तू भज। मजसी अर्जुना ।।१२५।।
बुध्दीच्या पाठी पोटी। कर्माच्या आदि शेवटी। मज स्मरणे किरटी। जर कठीण तुजला ।।१२६।।
तर माझाही नाद सोड। पण मनी असू दे समत्वाची चाड। फुलता कर्म समवचे झाड। प्राप्ती माझी ।।१२७।।
इच्छा मजसी पावण्याची। वा माझ्या सायुज्यतेची। ठरते ती बा अडचणीची। प्रकटनास माझ्या ।।१३०।।
ऐसे कर्मसंस्कार संपता। प्रकटते ती निकामता। मन निष्काम होता। प्रकटे शांति ।।१३९।।
करणे ग्रंथाचे वाचन। ते असे बा शब्दज्ञान। शब्दज्ञानाहून ध्यान। महत्वाचे अर्जुना ।।१४१।।
जया म्हणती ध्यान। तेच बा कर्मफल त्यागणं। फलत्यागात शांति प्रकटन। आहे अर्जुना ।।१४२।।
मग सर्व भुतांच्या ठायी। द्वेषाचे नांव नाही। आपपार भाव तोही। नाही कोठे ।।१४४।।
ऐसी सर्व भूतमात्रासी। मैत्री तयाची खासी। अनुभवत असे एकता विश्वासी। अंतरंगी तो ।।१४८।।
मी-तूपणाची भाषा विसरून। काहीच नसे तयाचं मागणं। मग सुख दुःखाचं अनुभवणं। संपे तेथे ।।१४९।।
जयाच्या त्या मनातून। इच्छाच गेल्या निघून। तेथे सुखाचं ते नांदणं। अनिवार्य की ।।१७२।।
संताच्याच त्या कृपेने। गंगेने पाप ते धुणे। त्या संतसंगाकारणे । शुध्दि अनंत ।।१७७।।
तैसे कर्मसंस्कार संपता। प्रकटते अंतरी शांतता। शांततेत मग मुक्तता। ठेवली असे ।।१८४।।
जी ब्रम्हमयता मी सांगितली। ती जयांनी अनुभवली। तयासच समजली। भक्ती माझी ।।२३०।।
करी मोक्षाचे निरूपण। ब्रम्हमयता ती सांगून। पसरवी परम ज्ञान। लोकामाजी ।।२३२।।

Scanned with CamScanner

अध्याय तेरावा

सर्वच असती अज्ञानात। कोणालाच नाही काही कळत। म्हणून वादविवादात। भांडणे होती
अज्ञानाचे कारणे। सुखाची इच्छा धरणे। तेच दु:खाचे पेरणे। आहे अर्जुना
मनी इच्छा प्रकटली। पण जर ती पूर्ण न झाली। मग वृत्ती जी विकारली। तिचे नांव द्वेष
कामना त्या संपता। संपते ते अहंकारता। ऐसा मी-पणाचा राबता। मोडून जाये
मी-पण ते संपता। अंतरी प्रकटते शांतता। शांततेत स्वस्वरूपता। ठेवली आहे
मनी प्रकटता शांति। संपून जाती सर्व वृत्ती। आणि मग ती सुषुप्ति। अनुभवा येते
सुषुप्तीचा ओलांडता घाट। पडते आत्मतत्त्वाची गाठ। तीच सुखाशी भेट। आहे अर्जुना
ऐसी ही अवस्था। अंतरी न अनुभवता। जगणे तेच पार्था। दु:ख आहे
कामनांच्या कारणे। दु:खाचे ते भासणे। कामनांचे ते संपणे। सुख अर्जुना
क्षेत्र ते गुण विकार। सांगितले तुज सविस्तर। क्षेत्रातून मुक्तीचा विचार। ज्ञान आहे
ऐसे ते ज्ञान। योगी स्वत:च होती गगन। स्वर्गाचा मोह टाळून। मुक्त होती
ऐसे अनुभवता ज्ञान। प्रकटते मनी पवित्रपण। मग विटाळलेले मन। संपून जाई
जर खोल जमिनीत। मुळांना पाणी असे सापडत। असती मग पानेफुले बहरत। बाहेर अर्जुना
कोंभाचे टवटवीतपण। सांगे भूमिचे सुपीकपण। तैसे ज्ञान्याचे आचरणावरून। आकळे ज्ञान
बीज भूमीत पेरणं। तयाचाच वृक्ष होणं। तैसेच मनाचे प्रकटन। शरीर अर्जुना
जे मनात असते। तेच बाहेर प्रकटते। म्हणून अहिंसाच असते। वर्तनी त्याच्या
अंतरी जे असते। तेच बाहेर बा प्रकटते। मग मनइंद्रियांचे व्यवहार ते। तैसेच होती
जे मनातच नाही। अर्जुना ते प्रकटत नाही। बीजेवीण का भुई। अंकुर फुटे
अर्जुना हे मन। सर्व घडामोडीचं कारण। येथे सर्व काही घडणं। मनाकारणे
ऐसे जीवभाव टाकणे। मनइंद्रिया सोडणे। अंतरी ब्रम्हमय होणे। भक्ती अर्जुना
ध्यान करून। स्वत:चं चैतन्य होणं। जीवभाव सांडणं। भक्ती अर्जुना
ऐसे गुरुकृपे कारण। स्वत:च ब्रम्ह होणं। तेच बा ध्यान। आहे अर्जुना
ऐसे स्वत: जागून। इतरांनाही जागवणं। तीच बा सेवा करणं। ईश्वराची
तयाने जीवभाव संपवून। सर्व जगतासी एकरूप होणं। त्या नाव ज्ञान। अर्जुना माझ्या
अतिरेक तो सोडावा। केवळ अर्थ तो जाणावा। सार तो ग्रहण करावा। अंतरी तुम्ही

Scanned with CamScanner

मनीचे भेदाभेद गेले। मन ब्रम्हमय झाले। मग असे जे उरले। शुचित्व अर्जुना ।।४७५।।

मनी समत्व असणं। तेच ज्ञानाचं लक्षण। समत्व आणि ज्ञान। भिन्न नाही ।।४८५।।

संकल्प विकल्प ते संपता। चित्त लया जाता। समाधि ती लागता। ज्ञान होई ।।५१०।।

म्हणून येण्याआधी म्हातारपण। तयाने ब्रम्हमय होणं। तेच आहे ज्ञान। अर्जुना माझ्या ।।५८७।।

धडधाकट जोवर शरीर। तेव्हाच करून तयाचा वापर। तो होतसे पार। भवचक्राच्या ।।५८८।।

दुःख जयाचे कारणे। आणि शोकाचे उपजणे। ते सोडून सावधपणे। मुक्त होई ।।५९०।।

ज्या ज्या कर्माकारण। दोषांचं होई प्रकटन। ते ते सर्व सोडून। देतसे तो ।।५९१।।

मनोभूमिका ऐसी। असते जयाच्या मानसी। तयाची एकी ज्ञानासी। झाली अर्जुना ।।५९२।।

ऐसे नभाच्या प्रमाणे। समत्व मनी असणे। तेथे ज्ञानाचे नांदणे। ओळख तू ।।६०३।।

सोडून मन बुध्दि इंद्रियांना। एकी करतसे तो ज्ञाना। संपवून ऐसे अज्ञाना। तो अमर होई ।।६२०।।

सत्य केवळ आत्मज्ञान। बाकी सर्व अज्ञान। ऐसा निश्चय असणं। अंतरी त्याच्या ।।६२१।।

तयाच्या ठायी ज्ञान। चूक ते बोलणं। तो आणि ज्ञान। भिन्न नाही ।।६२३।।

त्या शास्त्राचे कारणे। जर न होई ज्ञानाचे प्रकटणे। ते तर मग अज्ञान असणे। जाण अर्जुना ।।६२८।।

जे जे दृष्टीस दिसावे। ते परमात्म स्वरूप असावे। ऐसे मन ते व्हावे। शुध्द अर्जुना ।।६२९।।

जे जे येती अनुभव। ते सारेच बा देव। ऐसा विश्वात्मक भाव। मनी त्याच्या ।।६३०।।

अनंता ज्ञाना कारण। बुध्दिही अनंत होणं। ते ज्ञान शब्दानं। न सांगता येते ।।६३१।।

ज्ञानाच्या कारण। विश्वचि ब्रम्ह होणं। तेथेचि आहे ज्ञान। समज तू अर्जुना ।।६३२।।

झाले असता ज्ञान। आपोआप उमजते अज्ञान। अंतरी होणे ज्ञान। सूत्र आहे ।।६५४।

तैसे सर्व शास्त्रांचे ज्ञान। आघवेचि अप्रमाण। एका आत्मज्ञानावीण। निरर्थक सारे ।।८३९।

ज्याला बोध नाही स्वतःचा। अर्जुना तो बिनकामाचा। केवळ त्या पुस्तकी ज्ञानाचा। उपयोग नाही।।८४०।

मग हारपता आकार। तया म्हणतात रूद्र। तिन्ही गुणांच्या पार। शून्य जे ।।९२५।

अनित्यता देहाची जाणून। मनइंद्रियाना त्यागून । मजसी एकरूप होणं। भक्ती अर्जुना ।।९४४

अंतरी ब्रम्हमय होणे। तेचि बा मजसी जाणणे। मीच होऊन मला अनुभवणे। सूत्र अर्जुना ।।९४५

मनइंद्रिया त्यागता। आशा इच्छा विरता। विचारकल्पना संपता। भेट माझी ।।९४६

रहस्य जे उमजता। प्रकटते ब्रम्हमयता। ते सूत्र तुला आता। सांगितले मी ।।९४९

केवळ ग्रंथ ते वाचून। न होते कधी ज्ञान। इच्छा कल्पना संपणं। सूत्र आहे ।।९४८

Scanned with CamScanner

न संपता इच्छा वासना। कैसे पावशील ज्ञाना। निरसू दे त्या मना। होण्या ज्ञान ।।९५०।।

मनाचि व्यर्थता जाणून। घडो इच्छा वासनाचं त्यागणं। मग होते पहा ज्ञान। अर्जुना माझ्या ।।९५१।।

अस्तित्व प्रक्रियेस जाणणं। तेचि बा आत्मज्ञान। पुरूष प्रकृतीस ओळखणं। ज्ञान आहे ।।१०३२।।

छत्तीस तत्त्वांना ओलांडून। पंचभुतापार जाणं। मनइंद्रिया तादात्म्य तुटणं। सूत्र आहे ।।१०३८।।

ऐसे साक्षीभाव साधून। स्वप्न सुषुप्ती ओलांडणं। आपली भेट आपण घेणं। ज्ञान आहे ।।१०३९।।

समत्व बुध्दि प्रकटता। अनुभवा येते ब्रम्हमयता। मग मरणाची ती वार्ता। उरेचिना ।।१०७७।

साक्षी आणि मन समता। हीच ब्रम्हमयतेची रहस्यता। अहंभाव तो संपता। प्रकटे मोक्ष ।।१०७८।

जयाने बा अनुभवला। अंतरी क्षेत्र क्षेत्रज्ञाला। तयासीच बा कळला। शब्द माझा ।।११२९।।

ज्ञानाजनांच्या संगतीत । दोहोंची ओळख असे होत। दोहोंना अनुभवणे अंतरात। ज्ञान अर्जुना ।।११३०।।

Scanned with CamScanner

अध्याय चौदावा

जोवरी न होते आत्मज्ञान। तोवरीच चालते वर्णन। मग पडे मुकेच ते होणं। पडता गाठ ।।११।।

होता मजसी ज्ञान। करीन संतांचे वर्णन। ब्रम्हमयता ती पसरवीन। जगतामाजी ।।१८।।

खरे तर हे ज्ञान। आहो स्वतःच आपण। पण मनइंद्रियांच्या नादी लागून। परके झाले ।।४२।।

अगा याचि कारणे। हे सर्वोत्तम मी म्हणे। इतर भौतिक ज्ञाने। अज्ञानच की ।।४३।।

विचार असता मनात। आत्मज्ञान नाही प्रकटत। जसा अंधार नसे दिसत। लावता दिवा ।।७२।।

शेण आणि सोनं। गार आणि रत्न। दोन्ही बा समान। ज्ञानीयासी ।।३५७।।

ब्रम्हमय होणे। तेचि मजसी आराधणे। नाही कोणत्याही साधनाने। प्राप्ती माझी ।।४०२।।

विवेकाच्या कारण। सर्व कामना सोडून। ब्रम्हमय होणं। ज्ञान आहे ।।४०७।।

Scanned with CamScanner

अध्याय पंधरावा

ठाव न पावता जयाचा। मनासह विरते वाचा। तेव्हा देव या शब्दाचा। समजतो अर्थ ।।१५।।
श्रवण वाचना न समजे। साधनेस ही न उमजे। ऐसे अगोचर ते पाविजे। विरता मन ।।१६।।
प्राप्त होण्या हे ज्ञान। योग्य तोचि जाण। विरक्त ज्याचे मन। जाहले अर्जुना ।।३३।।
मोक्षलाभ घडविते ज्ञान। यात शंकाच ती नसणं। पण शुध्द मनावीण। ज्ञान कैचे ।।३५।।
त्या बा विरक्ती वाचून। प्राप्त होत नसे ज्ञान। आहे सांगितले भगवंतानं। गीतेमाजी ।।३६।।
त्या विरक्तीची प्राप्ती। होतसे कवणे रिती। विरक्तीविना प्रचीती। नाही अर्जुना ।।३७।।
तैसी संसाराची समस्त। अनित्यता जाणता अंतरात। वैराग्य असे प्रकटत। जीवनी अर्जुना ।।३९।।
व्यर्थता मनइंद्रियांची जाणून। ब्रम्हमय ते होणं। तयाचे ते वर्णन पंधराव्यात ।।४३।।
प्राप्त होण्या ज्ञान। जी आहेच मोठी अडचण। त्या विश्वाभास घे समजून। अर्जुना तू ।।४६।।
कार्यकारणा कारण। होते वृक्षाचे प्रकटन। नामरूपाचं ते होणं जाणं। वृक्ष अर्जुना ।।७६।।
ज्ञाता ज्ञेयावीण। नुसतेच बा ज्ञान। ते जाणीवरूपी गगन। स्वरूप त्याचे ।।७७।।
जसे पाणी वाहते वेगात। तसे जग असे बदलत। म्हणून अनित्य मानतात। संत याला ।।१३३।।
अर्जुना एका निमिषात। करोडो वेळा उदयव्यय असे होत। जसे तरंग ते उठतात। सागरामाजी ।।१३४।।
उदयव्यय न दिसत्यानं। नित्य आहे असं वाटणं। तेच भ्रमाचं कारणं। आहे अर्जुना ।।१३५।।
डोळ्यास नाही दिसत। उदयव्यय जो असे घडत। म्हणून अव्यय असे वाटत। हे विश्व अर्जुना ।।१३८।।
याला जो असे ओळखत। त्याच्या येते बा लक्षत। कोटी उदयव्यय निमिषात। होती येथे ।।१३९।।
मूळ याचे अज्ञान। म्हणून भ्रमाचं भासणं। याचे खोटेपण समजणं। ज्ञान अर्जुना ।।१४०।।
तयालास मी पांडूसुता। सर्वज्ञ म्हणे जाणता। जयाने अनुभवली ब्रम्हमयता। अंतरात ।।१४१।।
जसे त्या वांझेनं। मुलाची जन्मपत्रिका काढणं। तितकेच असत्य असणं। हे जग अर्जुना ।।२३४।।
तैसे ते निळेपण। नसूनही आकाशी भासणं। तैसेच या वृक्षाचं असणं। आहे अर्जुना ।।२४२।।
जया नाही आदि अंत। जो असे केवळ भाासत। तया उपटण्याची खटपट। व्यर्थ अर्जुना ।।२४७।।
अहंकार अज्ञानाच्या कारणे। नसूनही तयाचे भासणे। म्हणून अहंकार अज्ञान निरसणे। सूत्र आहे ।।२४८।।
एका आत्मज्ञानावीण। अन्य उपाय करणं। ते संसारवृक्ष वाढवणं। आहे अर्जुना ।।२४९।।
संपवण्या हा संसार। येथे उपायांची नाही जरूर। करणे प्रयत्नांचा वार। अपाय येथे ।।२५३।।
जसे संपण्या ते दुःस्वप्न। जागणेचा उपाय असणं। तैसे अर्जुना आत्मज्ञान। उपाय येथे ।।२५४।।

Scanned with CamScanner

अध्याय सोळावा

मनाच्याच कारण। जीव गेला होता भ्रमून। त्या मनास येता मरण। ज्ञान झाले ।।५।।

मन ते विरता। भअनुभवा येते ब्रम्हमयता। जाणता मन इंद्रियांची व्यर्थता। ज्ञान होते ।।७।।

आत्मज्ञानी गुरू भेटता। होते मनाची बा सांगता। मगच ती स्वरूपता। अनुभवा येते ।।८।।

मूळ माया विरता। विश्वाचा आभास लोपता। सर्वत्र मग ब्रम्हमयता। भरली आहे ।।११।।

चारी वाचा मौन होता। अनुभवाचे व्दैत संपता। मन संपूर्ण लया जाता। प्रकटते ज्ञान ।।१९।।

प्राप्त होण्या आत्मज्ञान। केवळ ज्ञानच आहे साधन। सांगितले स्पष्ट करून। भगवंताने अर्जुना ।।४५।।

द्रष्टा दृश्याची अभिन्नता। अर्जुना अंतरी उमजता। विश्वाची भासमानता। लयासी जाते ।।५०।।

अर्जुना एवढा सामर्थ्यवान। उपाय नसे अन्य। केवळ सम्यक ज्ञानानं। प्रकटन ब्रम्हाचे ।।५१।।

केवळ सम्यक ज्ञानानं। होते अभयाचे प्रकटन। अभय आणि ज्ञान। भिन्न नाही ।।७३।।

शुध्द मना ब्रम्हसूत्र। अशुध्द मना नाममंत्र। आकळण्या ते परत्र। मार्ग हाचि ।।१०४।।

ईश्वराची तहान असणं। मग ज्ञानमार्ग अवलंबून। मन इच्छेस विरू देणं। अनिवार्य अर्जुना ।।१८६।।

माळ सव्वीस फुलांची घेऊन। त्या मुक्तीरूपी नवरीनं। विरक्तास बा घालणं। तैसेच हे ।।२०९।।

होता ते आत्मज्ञान। प्रकटती हे सव्वीस गुण। तेच गीतेचे आकलन। अर्जुना माझ्या ।।२१०।।

जर एखाद्या ज्ञान्यानं। केली ज्ञानाची घोषणा दिमाखानं। मग ज्ञानच दोषाचं साधन। झाले अर्जुना ।।२२२।।

आपल्या ज्ञानाचं प्रदर्शन। करणे चौरस्त्यावर आपणहून। तोच बा दंभ म्हणून। जाण अर्जुना ।।२२३।।

जैसे मूर्खाचे ते वागणे। किंचित घडले आकळणे। मग सर्वांना नावे ठेवणे। दर्प अर्जुना ।।२२४।।

अर्जुना त्या सत्संगाकारण। आत्मशुध्दीचा मार्ग उमजून। जन्म-मृत्यूच्या कचाट्यातून। सुटतो जीव।।४४१।।

आत्मज्ञान होता। स्मरते आपली स्वरूपता। जीवभावाचा गुंता। विरून जाई ।।४४२।।

स्वतःच आत्मतत्व होऊन। व्दैतभाव खुंटून। विश्वाचं ते भासणं। संपून जाई ।।४४३।।

ऐसे कामक्रोध विरता। ज्ञान होते पांडुसुता। मग विश्वाची ती सत्ता। अंतराठायी ।।४४४।।

श्रीगुरूंच्या त्या वचना। देता मिठी अर्जुना। शिष्य ती आत्मभावना। अनुभवे अंतरी ।।४५७।।

तैसे होण्या ते आत्मज्ञान। संतांना जावे शरण। तरच स्वरूपाचे भान। अंतरी प्रकटे ।।४५९।।

जे योग्य म्हणे जीव। ते सर्व अर्जुना त्यागावं। केवळ संतांचच ऐकावं। आत्मकल्याणा ।।४६०।।

अर्जुना आकळता संतवचन। दूर नाही आत्मज्ञान। आत्मतत्त्वाचं प्रकटन। संतांचे संगती ।।४६१।।

ते अहितापासून काढिती। हित देऊन वाढविती। नाही गा संतापरौती। माऊली जगा ।।४६२।।

संतांच्या बा कारण। ब्रम्ही एकरूप होणं। म्हणून संतांपासून दूर जाणं। न घडो अर्जुना ।।४६३।।

आपले कर्तव्य ओळखून। करावे अर्जुना आचरण। निष्काम कर्म करणं। रहस्य आहे ।।४६७।

अर्जुना होऊन सावधान। पाळावे संतांचे वचन। मोहाच्या नादी लागणं। चांगलं नाही ।।४६८।

जो स्वतःकडे पाहीन। तो मुक्त बा होईन। हे आहे वचन। ज्ञानदेवाचे ।।४७३।

Scanned with CamScanner

अध्याय सतरावा

तुला वेगळे मानून। जे करती बा साधन। तया कधीच आत्मज्ञान। होत नाही ।।१२।।
जे ध्यानात तुला देखती। नाही तया तुझी प्राप्ती। जे ध्यानात विरून जाती। तया होते ज्ञान ।।१३।।
त्या जाणिवेच्या रूपानं। तुझं सर्वत्र बा नांदणं। वेदाही तुझे आकलन। कठीण भगवंता ।।१४।।
मौनात तुझं प्रकटन। व्यर्थ ते स्त्रोत्रांचं रटणं। व्दैतात तुला ते भजणं। मायाचि असे ।।१५।।
तुला देव कल्पून। सेवा तुझी करणं। ऐसा भेद मानणं। देवा तो द्रोह ।।१६।।
होण्या तुझे ज्ञान। काहीच न लगे साधन। विरून जाणे मन। सूत्र आहे ।।१७।।
नुसती श्रध्दाच असता मनात। ज्ञान करू पाहे तू प्राप्त। श्रध्देने पोहणे ज्ञानापर्यंत। सोपे नाही ।।५०।।
जैसी श्रध्दा मनात। तैसेच अनुभव असती येत। मनास बा करते संमोहित। श्रध्दा अर्जुना ।।५१।।
गंगोदक जरी झाले। मद्याच्या सानिध्यात आले। मग ते वायाच गेले। तैसे अर्जुना ।।५२।।
श्रध्देच्या त्या कारण। श्रध्दाच अनुभवा येणं। ते अवघेच बा संमोहन। मनाचे अर्जुना ।।५४।।
सत्त्वाच्या त्या द्वारानं। शक्य मोक्षाचे प्रकटन। पण त्रिगुण विसर्जित होणं। सूत्र आहे ।।६३।।
इच्छांच्या त्या कारण। क्षुद्र देवतांचे पूजन। सप्ताहभर उपास करणं। तयांनी अर्जुना ।।९८।।
काया वाचा आणि मनाने। पापांशी संबंध न ठेवणे। इतकेच ते बा सांगणं। माझे तुला ।।१०६।।
त्या स्वस्वरूपावाचून। मनी काहीच इच्छा नसणं। ऐसे विरक्त ते होणं यज्ञ अर्जुना ।।१७६।।
श्रेष्ठ सर्व तीर्थाहून। जे मायबापच असणं। तयांची सेवा करणं। धर्म त्यांचा ।।२०७।।
मन समत्वासी पावता। अनुभवा येते ब्रम्हमयता। मग आपली विश्वामकता। उमजते अंतरी ।।३८३।।
जया म्हणती ब्रम्ह। अर्जुना तेच बा आहे नाम। जाणणे अंतरी हे वर्म। ज्ञान अर्जुना ।।४००।।
मनी इच्छा धरून। जरी केला अश्वमेध यज्ञ। वा गणित जरी केले दान। ते व्यर्थ अर्जुना ।।४१५।।

Scanned with CamScanner

अध्याय अठरावा

तुझी स्तुती ती करणं। ते देवा अज्ञान। केवळ साक्षी मौन। स्वरूप तुझे ।।२४।।
स्तुती म्हणजे मौन। पूजा म्हणजे काही न करणं। शून्य होऊन जाणं। दर्शन तुझे ।।२५।।
मनोनिवृत्तीचा प्रकार। जे सर्व शास्त्रांचे सार। ते सांगितले सविस्तर। गीते माजी ।।३८।।
ऐसे होणे आत्मज्ञान। तेच भेटणे भगवान। होते मोक्षाचे प्रकटन। ज्ञान होता ।।४७।।
सर्व सातशे श्लोक। तेच अठरा अध्यायांचे लेख। सर्वत्र देवो बोलले एक। दुजे नाही ।।५८।।
तैसीच वाट धरून। मी केले आहे निरूपण। परि सर्वत्र ते ज्ञान। एकचि आहे ।।५९।।
अर्जुना ब्रम्ह न जाणता। जर आचरली केवळ कर्मठता। मग अंतरीची अशुध्दता। जाईच ना ।।६१।।
जीव त्या अज्ञानाकारण। न जाणे ब्रम्हज्ञान। केवळ का ओम तत्सत् शब्दानं। ज्ञान होते ।।६३।।
निष्काम कर्म घडता। प्रकटते ती ब्रम्हमयता। अन्यथा ती ब्रम्हमयता। प्रकटेच ना ।।६७।।
कर्माची समज येऊन। कर्माचा त्याग घडणं। मन निष्काम होणं। संन्यास आहे ।।६९।।
कर्माची व्यर्थता समजते। तेव्हाच कर्म विरते। मगच अंतरी प्रकटते। ब्रम्हज्ञान ।।७०।।
कर्माचे संपूर्ण संपणे। तया मी संन्यास म्हणे। आणि केवळ फल न इच्छिणे। त्याग आहे ।।९२।।
मनी स्थापून अवधाना। घडू द्यावे या कर्मांना। त्यागणे तयांच्या फळांना। सूत्र की ।।१२५।।
संन्यासाचे होता प्रकटन। नच घडते ते कर्मबंधन। संपूर्ण कर्म निरसणं। मोक्ष आहे ।।१२७।।
जेधवा कर्माची समज येते। आणि कर्म विरून जाते। मगच आत्मज्ञान होते। नष्ट होता कर्म ।।१२९।।
करण्या शुध्द ते मन। कर्मचि असो वा साधन। कर्मात कर्माचं निरसणं। सूत्र आहे ।।१३९।।
कर्म सिध्दांत जाणणे। कर्मी निष्काम होणे। तरच मन शुध्द होणे। घडते अर्जुना ।।१४३।।
जर कर्मी निष्कामता नसेल। मग सर्व वाया जाईल। भवचक्रातच तो फिरेल। जीव अर्जुना ।।१४४।।
जर मुक्तीची इच्छा असणे। मग पडे ब्रम्हमय होणे। वरवरच्या उपायाने। मुक्ती नाही ।।१४७।।
जोवरी न प्रकटे आत्मज्ञान। न सोडावे अर्जुना साधन। यागादिक ते करणं। तो शोध अर्जुना ।।१५२।।
आपल्या अधिकाराप्रमाणं। करत जावे ते साधन। पण साधनी निष्काम राहणं। सूत्र आहे ।।१५३।।
वेगात जयाचे चालणे। मग लवकर तयाचे पोहोचणे। तैसे कर्मी निष्काम होणे। सार आहे ।।१५४।।
जैसे योग्य औषध घेणे। मगच घडे रोगाचे संपणे। त्वरित कर्मी निष्काम होणे। रहस्य आहे ।।१५५।।
अर्जुना निष्काम ते राहत। सर्व कर्मे जर केलीत। मग रज तम रितात। आपोआप ते ।।१५६।।
जैसे आगीत ते जाळता। सोन्यासी येते शुध्दता। तैसे निष्काम कर्म करता । प्रकटे शुध्दी ।।१५७।।

Scanned with CamScanner

निष्काम कर्म करता । प्रकटते ती सात्त्विकता। म्हणून तीर्थांची योग्यता। कर्मासी अर्जुना ।।१५९।।

तीर्थाने जातो ब्रम्ह मळ। निष्काम कर्मात सात्त्विकता उजळ। म्हणून कर्मे असती निर्मळ। तीर्थांप्रमाणे ।।१६०।।

जसे एकाद्याला बुडताना पाहून। नदीनेचच मदतीला धावणं। तैसे कर्मांच्याच आधारानं। प्रकटते मुक्ती ।।१६१।।

जैसे मृत्यूच्याकारण। पुढील जन्माचं प्रकटणं। घडता सर्व कर्मांचं निरसणं। प्रकटते मुक्ती ।।१६२।।

तैसे समज ती येवून। घडो कर्माचं आचरण। कर्मी कर्माचं निरसणं। सूत्र आहे ।।१६३।।

कर्म सिध्दांत तो जाणून। अंतरी निष्काम होणं। मग कर्माचे ते बंधन। विरून जाई ।।१६४।।

करावे कोणतेही साधन। पण कर्तेपणावीण। तेव्हा ते कर्मबंधन। तुटते अर्जुना ।।१६६।।

दुधाची अपेक्षा न ठेवतो। गायी वळणारा गुराखी तो। तैसे व्यवहार कल्याण करतो। जिवाचा अर्जुना ।।१७४।।

ऐसा कर्मसिध्दांत उमजून। निष्काम कर्मांचचा घडणं। तयासीच ते आत्मज्ञान। प्राप्त होते ।।१७५।।

म्हणून फल इच्छा टाकून। सांडून ते कर्तेपण। कर्मे करावीत माणसानं। निरोप माझा ।।१७६।।

जैसे कर्मीच संपते कर्म। हेच आत्मज्ञानाचे वर्म। जाणणे हा कर्मांचा धर्म। सूत्र आहे ।।१८२।।

कर्मांची समजत असते। विहित कर्महीं कळते। पण निष्कामता न आवडते। राजसा अर्जुना ।।१८४।।

तैसे देहकष्टाला भिऊन। कर्मांचं जे त्यागणं। तया मोक्ष तो मिळणं।

Scanned with CamScanner

मनाविरूध्द ते घडता। द्वेष न यावा चित्त। नि मनाप्रमाणे घडता। न व्हावा हर्ष ।।५९२।।
मातापित्यास लाथाडून। जगास आदर देणं। ते मूर्खपणाचं वागणं। अर्जुना माझ्या ।।५९५।।
प्राप्त होण्या आत्मज्ञान। सदैव असणे सावधान। अवधानी अर्जुना कर्मबंधन। तुटे येथे ।।७००।।
ज्याला सुखाची आस। त्याने करावा हा अभ्यास। होई जीवभावाचा नाश। तयाने अर्जुना ।।७७६।।
ऐका ते संतवचन। प्रकटे अर्जुना अवधान। मग बुध्दीची वाट लागणं। घडे तेथे ।।७८३।।
रागद्वेष तो संपता। प्रकटते मनी समता। मग मनइंद्रियांसी तादात्म्यता। तुटून जाई ।।७८४।।
तैसे होण्या आत्मज्ञान। जावे लागे अति दु:खातून। मगच आत्मतत्वाचे प्रकटन। होई तेथे ।।७८८।।
वैराग्यरूपी विष। जयाने गिळले नि:शेष । तेथेच आत्मतत्त्व खास। प्रकटते अर्जुना ।।७८९।।
आपले नित्य कर्म तो। फलेच्छा त्यागून करतो। म्हणून मोक्षास पात्र तो। आपोआप ।।८९९।।
आत्मज्ञानाच्या तळमळीकारण। होता वैराग्याचे प्रकटन। विश्व वमनासमान। वाटते अर्जुना ।।९१९।।
जरी अजून न झाले ज्ञान। पण ज्ञानाच्या तळमळीकारण। आत्मज्ञाना पात्र होणं। तयाने अर्जुना ।।९२१।।
म्हणून प्राप्त होण्या आत्मज्ञान। करावे स्वधर्माचेच आचरण। स्वकर्मीच मोक्ष प्रकटन। घडे अर्जुना ।।९२२।।
आपला हा स्वधर्म । आचरणी जरी विषम। पण अंती तयाचा परिणाम। मोक्षदायी ।।९२३।।
अर्जुना स्वत:च्या आरोग्याला। आवश्यक जर कडुनिंबपाला। मग तयाच्या कडूपणाला। कंटाळणी नाही ।।९२४।।
केळीच्या फलधारणेस । खूपच लागती दिवस। म्हणून केळीचे झाड तोडल्यास। न मिळे केळी ।।९२५।।
तैसे स्वधर्म मानला कठीण। मग मोक्ष नक्कीच दुरावणं। केवढे अर्जुना नुकसान। होईल मग ।।९२६।।
म्हणून स्वधर्मच पाळाचा। परधर्म तो टाळावा। ऐसा नियम ठेवावा। अर्जुना तू ।।९३४।।
जोवरी त्या आत्मज्ञाना। न प्राप्त होशी तू अर्जुना। तोवरी स्वधर्म आचरणा। सोडावे ना कधी ।।९३५।।
कोणतेही कर्म करता। आहे कष्टाचीच वार्ता मग स्वधर्माचा राबता। योग्य की ।।९३६।।
ऐसी वासनेचे शमनं। ते भाग्याचं लक्षण। ऐसे ज्ञाना पात्र होणं। तयाने अर्जुना ।।९६३।।
अविद्येचा संपूर्ण होऊन नाश। तुटे जन्ममरणाचा भास। तयाचेच नाव संन्यास। अर्जुना माझ्या ।।९७२।।
अर्जुना गुरूकृपा होता। लाभते ही ब्रम्हमयता। विरळयासच बा प्राप्तता। तियेचि अर्जुना ।।९८४।।
नशिबाच्या त्याकारणे । गुरूवाक्य कानी पडणे। मग व्दैतच संपून जाणे। अनायासे ।।९८८।।
शुध्द सात्त्विक नसता मन। अर्जुना ब्रम्हमयता कठीण। अशुध्दीस ते गुरूवचन। न उमजे कधी ।।९९१।।
लाभले मन निर्मळ। सोबत सद्गुरूचा मेळ। पण लागेच अर्जुना वेळ। ज्ञान होण्या ।।१०००।।
तैसा वैराग्यलाभ झाला। वरी सद्गुरूही भेटला। जिवासी अंकुर फुटला। विवेकाचा ।।१००१।।
अनुभवून ब्रम्हमयता अर्जुना। तो प्राप्त झाला ज्ञाना। मग अंतरी त्या कामना। नुरती येथे ।।१००३।।

Scanned with CamScanner

जागृती स्वप्न सुषुप्ति। होता तिन्ही अवस्थांची समाप्ती। ज्ञानास त्या मिठी। पडेल अर्जुना ।।१००४।।
ब्रम्ही एकता पावून। ब्रम्हचि होऊन जाणं। जी जाणिवेचीच खाण। अर्जुना माझ्या ।।१००६।।
ज्ञानाच्या ओढीकारण। मनासी तादात्म्य तुटून। होते वैराग्याचे प्रकटन। तयाच्या अंतरी ।।१०१४।।
ऐशा सात्त्वितेकारणा। तो प्राप्त शुध्द आचरणा। मग बा ती योगधारणा। ध्येय त्याचे ।।१०१८।।
गुरूवाक्य तो जागला। बोधात जो स्थिरावला। मग निरखत निरखत झाला। ब्रम्हचि तो ।।१०३२।।
त्या दृश्याचे कारणे। अर्जुना द्रष्ट्याचे भासणे। स्वनिरीक्षणात दृश्याचे विरणे। सूत्र आहे ।।१०३३।।
अर्जुना घे समजावून। खरे हेचि बा ध्यान। द्रष्टा दृश्याचं संपणं। ध्यान आहे ।।१०३४।।
म्हणोनी तो मुमुक्षु। होता आत्मज्ञानी दक्षु। योगाभ्यासाचा पक्षु। धरतसे तो ।।१०३५।।
रागद्वेष ते सोडून। सुषुम्नेशी जागवून। कुंडलीनीचे बा जागरण। अनुभवी अंतरी ।।१०३८।।
ऐसे निर्विकल्प होऊन। तयाने मनइंद्रिया ओलांडणं। हीच योगाचे शिकवण। आहे बा अर्जुना ।।१०४०।।
सतत सजग राहत। अंतरी अर्जुना पाहत। स्वप्नसुषुप्ति ओलांडत। तो ब्रम्ह होई ।।१०४४।।
अहंकार विषयांचा बा पूर। जो सर्व दोषांचाच सागर। पण ध्यानरूपी तलवार। संपवी त्यासी ।।१०५४।।
म्हणून सांडोनी तो काम। जो जाहला बा निष्काम। तेथे क्रोधाचे काम तमाम। होतसे अर्जुना ।।१०६१।।
ऐसे सम्यक त्या ज्ञानात। अर्जुना तो असे राहत। आणि होऊनी असे जात। ज्ञानचि तो ।।१०६८।।
ऐसे सम्यक ज्ञानी स्थिरावून। स्वप्न सुषुप्ति ओलांडून। स्वतःच ज्ञान होणं। तयाने अर्जुना ।।१०६९।।
पुढे बोधाचिये कांबीवरी। सरती दृश्ये अर्जुना सारी। मग ब्रम्हमयतेची बारी। येते बा अर्जुना ।।१०७०।।
मग ध्यान करणारे मन। अर्जुना जातसे ते संपून। जीवभावाचं खंडण। होतसे तेव्हा ।।१०७८।।
जैसे रस औषध खरे। आपले कार्यक करूनी पुरे। आपणही नुरे। होते तैसे ।।१०७९।।
कोणीतरी व्हावे। काहीतरी मिळवावे। हे सरले समभावे। ज्ञान होता ।।१०९६।।
ऐसे अव्यक्त ते जाणतम। मग बोध वाढता वाढत। संपूर्ण बोधही समस्त। बुडोनी जाये ।।११०१।।
जैसे भोजनाच्या समयी। भूक कमी कमी होत जाई। मग तृप्तीच्या त्याठायी। नाहीच की ।।११०२।।
पौर्णिमे चंद्रा पूर्णत्व भेटे। मग चंद्राची वाढ खुंटे। आणि शुक्लपक्ष मग आटे। तैसे अर्जुना ।।११०५।
तैसे व्दैत ते संपता। प्रकटते ती अव्दैतता। मी-तूपणाची कथा। संपुनी जाई ।।११०६।
तैसे ब्रम्हमयतेवाचून काही। अर्जुना तेथे उरत नाही। ती चौथी भक्ती पाही। माझी अर्जुना ।।११११।
इतर अर्जुना तीन। तयांची भक्ती बा भिन्न। जिच्याकारणे मी भेटणं। ती भक्ती चौथी ।।११११२।
जगी माझ्याविषयीचे अज्ञान। म्हणून भलतेच ते समजून। जाती लोक बा अडकून। इच्छांकारणे ।।११११४
अज्ञानाच्याकारणे। मज नामरूपी समजणे। मग मी तैसाच अनुभवा येणे। घडे अर्जुना ।।११११५

Scanned with CamScanner

अर्जुना कर्मयोगाद्वारे। संपवून व्दैताचे वारे। अनुभवणे मीच विश्व सारे। कर्मयोग ।।११३४।।
राजाच्या पोटी न जन्मता। न मिळे ती राजमान्यता। तैसे ब्रम्हमय न होता। न कळे ब्रम्ह ।।११४४।।
म्हणून जे मीच नाही झाले। मजसी तयांनी न जाणले। मग तयांनी मजला भजले। ते खोटेच की ।।११४६।।
तैसे नसूनही असणे। जे शब्दी न सांगता येणे। तिलाच मी भक्ती म्हणे। अव्दैत अर्जुना ।।११५१।।
ऐसे होता बा ज्ञान। द्रष्टादृश्य जाती संपून। आणि उरे ब्रम्हपण। सर्वत्र अर्जुना ।।११६४।।
आपले ते अव्दैतपण। जयाने अर्जुना जाणणं। ती जाणीव म्हणजेच ज्ञान। उमजते अंतरी ।।१२०४।।
तसा मी आधीपासून। मज पावण्या न लगे साधन। ओलांडणे सुषुप्ति जागृती स्वप्न। सूत्र आहे ।।१२२४।।
म्हणोनी माझेठायी। साधना न लगेचि काही। मन ज्याचे निष्काम होई। तो पावला मज ।।१२२५।।
वारा करे ढगा दूर। तो कैसा निर्मिल प्रभाकर। शेवळ होता ते दूर। उरे पाणी ।।१२३१।।
तैसे आत्मतत्त्वावर। असे अविद्येचा पदर। तो शास्त्राद्वारे होता दूर। प्रकटे तत्त्व ।।१२३२।।
म्हणोनी अवघेचि शास्त्र। ती अविद्या नाशाची सूत्र। ती नसती बा स्वतंत्र। आत्मबोध ।।१२३३।।
गीता ती आकळणं। तेचि निष्काम बा होणं। मग आत्मतत्त्वाचं प्रकटणं। अनिवार्य आहे ।।१२३६।।
होता निष्काम ते मन। जाई अविद्या संपून। अर्जुना हेचि बा ज्ञान। गीतेमाजी ।।१२४३।।
हे एवढेच ज्ञान। सांगितलं भगवंतान। होणे निष्काम मन। सूत्र आहे ।।१२४४।।
स्वकर्माच्या त्या पाऊली। माझी पूजा करणे भली। तया प्रसादे आकळली। ज्ञाननिष्ठा ।।१२४७।।
ती ज्ञाननिष्ठा जेथे वसे। तेथे भक्ती माझी उल्लासे। तया भजन समरसे। सुख होय ।।१२४८।।
मजसी एक होणं। तोच संन्यास जाण। करता मनाने मनाचे निरीक्षण। भेट माझी ।।१२६१।।
विवेकाच्या कारण। निष्काम होणे मन। मग सर्व कर्म निरसून। मीच होसी ।।१२६२।।
राहता या देहमनात। आहे प्रतिक्षणी आत्मघात। अडकणे बा तयात। दु:ख आहे ।।१२७६।।
आपल्या असणेपणाचा भास। तेचि परिच्छिन्न ब्रम्ह खास। जाणणे तयाच्या अनंत स्वरूपास । सूत्र आहे ।।१३१५।।
ज्ञान जे ब्रम्ह म्हणून। वेदांती प्रसिध्द असणं। तेच भरले बा ठासून। गीतेमाजी ।।१३२४।।
केवळ अवधान ठेवता। होते मोक्षाची प्राप्तता। असता दैवाची अनुकूलता। घडे सारे ।।१३४४।।
व्दैत ते संपणे। अव्दैत बा अनुभवणे। ते अवधानाच्याच कारणे। अर्जुना माझ्या ।।१३४५।।
अर्जुना ते व्दैत मन। तीच होती बा अडचण। निष्काम होता मन। भेट आपली ।।१३६४।।
ए-हवी निर्गुण म्हणून। जयाचे उपनिषदे करती वर्णन। ते ब्रम्ह बा जाणणं। मुक्ती आहे ।।१३७०।।
ऐसे करून निष्काम मन। अर्जुना गुणातीत होणं। मग स्वप्न सुषुप्ति ओलांडणं। सूत्र आहे ।।१३८४।।
सत्यज्ञान जे आपुले। नानापरी मी उपदेशिले। निष्काम करूनी मन आपले। सांडी बा अज्ञान ।।१३८९।।

Scanned with CamScanner

जैसे आकळता तो दोर। संपे सर्पाभासाचा प्रकार। तैसे होता ब्रम्हाकार। विरे अज्ञान ।।१३९२।।
राहणे मजकून भिन्नपणे। अर्जुना तेच पाप असणे। होई द्वैताचे संपणे। अद्वैत जाणता ।।१४१३।।
निष्काम करून मन। अर्जुना कर्म करणं। आहे तेथे मोक्ष प्रकटन। अनायासे ।।१४३८।।
मन निष्काम न होता। सार मनी न समजता। सर्व साधनांची व्यर्थता। समजो तुला ।।१४८२।।
श्रीगुरू प्रसन्न झाले। तयांनी ज्ञान सांगितले। आणि जर मन निष्काम न झाले। मग व्यर्थ सारे ।।१४८४।।
म्हणून मनाची निष्कामता। तीच धर्माची रहस्यता। निष्कामता प्राप्त होता। मुक्तीआहे ।।१४८५।।
तुवा हे जे पार्था गीताशास्त्र लाभले सर्वथा। जया नसे वा आस्था। न सांगावे तया ।।१४८६।।
साधनेत जो प्रविण। पण मोक्षाच्या ओढीवीण। तयासीही गीता सांगणं। टाळावे अर्जुना ।।१४८७।।
जया आवडे श्रवण। तयासीच सांगावे हे ज्ञान। निंदकापासून दूर राहणं। कल्याण दायी ।।१५०८।।
सकळ ज्ञानाचे ज्ञान। प्रकटले गीतेच्या रूपानं। निष्काम ते होणं। सूत्र आहे ।।१५२५।।
जयाने अंतरंगी बुडी मारणं। तयासीच होते ज्ञान। आणि केवळ वाचन श्रवण। सुख देई ।।१७४९।।
त्या ज्ञानाच्याकारण। घडे मनइंद्रिया ओलांडणं। मग ब्रम्हाची ती जाण। अंतरी येई ।।१७५५।।
तर्क बुध्दि सांडून। मन संपूर्ण निरसणं। तेव्हाच ती खूण। येतसे हाता ।।१७५६।।
आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे। तोषोनी मज द्यावे। पसायदान ।।१७९३।।
जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परे पडो। मैत्र जिवाचे ।।१७९४।।
दुरितांचे तिमीर जावे। विश्व स्वधर्मसूर्य पाहो। जो जे वांछील तो ते लाहो। प्राणीजात ।।१७९५।।
वर्षंत सकळ मंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळी। भेटो तया भूतां ।।१७९६।।
चला कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणीचे गाव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे ।।१७९७।।
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतू ।।१७९८।।
किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊन तिन्ही लोकी। भजिजो आदिपुरूखी। अखंडित ।।१७९९।।
आणि ग्रंथोपजीविये। विशेषी लोकी इये। दृष्टादृष्ट विजये। होआवो जी ।।१८००।।
तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो। येणे वरे ज्ञानदेवो। सुखिया झाला ।।१८०१।।
अनादि शिवपरंपरेत। प्रकटले श्रीनिवृत्तिनाथ। म्हणून गीता ओवीत। जाहली बध्द ।।१८०५।।
ऐसा त्या महाभारतात। भीष्मनाम पर्वात। संवाद श्रीकृष्णार्जुनात। जाहला सिध्द ।।१८०६।।
ते उपनिषदांचे सार। सर्व शास्त्रांचे माहेर। ज्ञानी जे सरोवर सेविती सदा ।।१८०७।।
तो हा गीतेचा कलश। संपूर्ण जो अष्टादश। म्हणे निवृत्तीचा दास। ज्ञानदेवो ।।१८०८।।
पुढती पुढती पुढती। ही ग्रंथपुण्यसंपत्ती। सर्वांसी ब्रम्हानुभूती। देईल अखंड ।।१८०९।।
शके बाराशते बारोत्तरे। ते टीका केली ज्ञानेश्वरे। सच्चिदानंदबाबा आदरे। लेखकु झाला ।।१८१०।।

ओम तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रम्हविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगोनाम अष्टादशोध्यायः।।१८।।

Scanned with CamScanner